## समाज कल्याण विभागाच्या आस्थापनेवरील गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांची सेवाप्रवेशोत्तर व अर्हताकारी खातेनिहाय परीक्षा

### अधिसूचना २०२४-२५

खाली नमूद करण्यात आलेल्या खातेनिहाय परीक्षा त्या समोर दर्शविलेल्या कालावधीत शासन निर्णय ११ जानेवारी १९७२ नुसार घेण्यात येतील.

| अ.क्र. | खातेनिहाय परीक्षा | कालावधी |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | **२४,२५ व २६ ऑगस्ट २०२४** |
| २ | वरिष्ठ लिपीक | **३०,३१ ऑगस्ट व ०१ सप्टेंबर २०२४** |
| ३ | समाज कल्याण निरीक्षक, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक व गृहपाल | |

उपरोक्त खातेनिहाय परीक्षेकरिता समाज कल्याण, आयुक्तालयाकडून प्राप्त **पत्र क्र. सकआ/आस्था-६/गट-क/परीक्षा/आयोजन/२०२४-२५/का-६/२६४३/दि. १०/०६/२०२४** च्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या नावांच्या यादीमधील उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेसाठी प्रवेश देण्यात येणार आहे. प्रस्तुत परीक्षेचे वेळापत्रक विभाग प्रमुख यांना पाठविण्यात येईल.

| विभागीय परीक्षा | विभाग प्रमुख |
|---|---|
| समाज कल्याण विभागाच्या आस्थापनेवरील गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांची खातेनिहाय परीक्षा २०२४-२५<br>१. कनिष्ठ लिपीक - सेवाप्रवेशोत्तर परीक्षा<br>२. वरिष्ठ लिपीक - अर्हताकारी परीक्षा<br>३. समाज कल्याण निरीक्षक, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक व गृहपाल - अर्हताकारी परीक्षा | मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१. |

**सुचना :-**

१. ज्या उमेदवारांना विभागाने परीक्षेस बसण्यास परवाणगी दिली आहे, त्यांना परीक्षा प्रवेशपत्र देण्यात येईल. प्रवेशपत्र तसेच ओळखपत्र दाखविल्याशिवाय उमेदवारांना परीक्षेस व परीक्षा कक्षात प्रवेश मिळणार नाही. तसेच परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी स्वत:ची ओळख (Identification) पटवून देण्याकरिता स्वत:चे पॅनकार्ड, आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसेंन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी **किमान एक ओळखपत्र मूळ प्रतीत व त्याची एक छायांकित प्रत - Self Attested,** तसेच कार्यालयाने दिलेले स्वत:चे ओळखपत्राची मुळ प्रत व त्याची एक छायांकित प्रत - Self Attested, सोबत आणणे आवश्यक आहे.

२. विभागीय परीक्षांचे निकाल घोषित झाल्यानंतर ज्या उमेदवारांना गुणांची पडताळणी (Retotalling) करावयाची आहे, अशा उमेदवारांनी निकालाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडे, बार्टी, पुणे यांजकडे अर्ज पाठविणे आवश्यक आहे. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा बार्टीकडून विचार केला जाणार नाही. याची सर्व परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

३. परीक्षार्थींच्या संधी या समाज कल्याण, आयुक्तालयाकडून प्राप्त पत्र क्र. सकआ/आस्था-६/गट-क/परीक्षा/आयोजन/२०२४-२५/का-६/२६४३/दि. १०/०६/२०२४ अन्वये अंतिम करण्यात आलेल्या आहेत. विषय सुट बाबत कोणत्याही परीक्षार्थींचे काही आक्षेप असल्यास अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत बार्टी कार्यालयास पुराव्यासह लेखी कळविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

**४. खातेनिहाय परीक्षेच्या पारंपारिक स्वरुपाच्या उत्तरपत्रिकेकरिता गुणांची पडताळणी (Retotalling) करण्यात येते, फेरमुल्यांकन केले जात नाही.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ★ पुणे-१ ★ सत्यमेव जयते

1/8/24

**महासंचालक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे-**

## समाज कल्याण विभागाच्या आस्थापनेवरील गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांची सेवाप्रवेशोत्तर व अर्हताकारी खातेनिहाय परीक्षा कार्यक्रम - २०२४

### कनिष्ठ लिपीक - सेवाप्रवेशोत्तर परीक्षा प्रती विषय १०० गुण

| दिनांक | वेळ | विषय |
|---|---|---|
| २४/०८/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | कार्यालयीन रचना **(पुस्तकासह)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | कार्यालयीन कार्यपध्दती **(पुस्तकाशिवाय)** |
| २५/०८/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | टिपणी तथा प्रारूप लेखन **(पुस्तकांशिवाय)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | सर्वसामान्य नियम व संहिता **(पुस्तकासह)** |
| २६/०८/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | मागासवर्ग, दुर्बल यांचेकरीता शासनाच्या कल्याणकारी योजना, सवलती आणि विशेष अधिकार **(पुस्तकांशिवाय)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | सामाजिक कायदे आणि नियम (मागासवर्ग, शारीरिक व मानसिक दुर्बल घटकांसाठी कायदे व विशेष अधिकार) **(पुस्तकासह)** |

### वरिष्ठ लिपीक - अर्हताकारी परीक्षा प्रती विषय १०० गुण

| दिनांक | वेळ | विषय |
|---|---|---|
| ३०/०८/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | शासन रचना **(पुस्तकाशिवाय)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | रचना व नियंत्रण तथा शिस्त **(पुस्तकासह)** |
| ३१/०८/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | सेवा नियम **(पुस्तकासह)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | वित्तीय नियंत्रण **(पुस्तकासह)** |
| ०१/०९/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | सामाजिक कायदे आणि नियम **(पुस्तकासह)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | मागासवर्ग, शारिरिक व मानसीक व्यंग असलेल्यांचे विशेष अधिकार व सवलती **(पुस्तकाशिवाय)** |

### समाज कल्याण निरीक्षक, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक व गृहपाल - अर्हताकारी परीक्षा प्रती विषय १०० गुण

| दिनांक | वेळ | विषय |
|---|---|---|
| ३०/०८/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | टिपणी व प्रारूप मसुदा लेखन **(पुस्तकाशिवाय)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | सेवा नियम **(पुस्तकासह)** |
| ३१/०८/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | महाराष्ट्र शासन रचना व कार्यपध्दती **(पुस्तकासह)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | वित्तीय नियंत्रण **(पुस्तकासह)** |
| ०१/०९/२०२४ | सकाळी १०:०० ते ०१:०० | कायदे आणि नियम **(पुस्तकासह)** |
| | दुपारी ०३:०० ते ०६:०० | योजना **(पुस्तकाशिवाय)** |

**परिक्षा केंद्र :- शासकीय सफाई कर्मचाऱ्यांच्या मुलां-मुलींची निवासी शाळा, बार्टी येरवडा संकूल, कॉमरझोन आय.टी पार्क जवळ, येरवडा, पुणे. ४११००६.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था

**सूचना :-**

१. ज्या उमेदवारांना कार्यालय प्रमुखांनी परीक्षेस बसण्यास परवानगी दिली आहे, त्यांना बार्टी मार्फत परीक्षा प्रवेशपत्र देण्यात येईल. प्रवेशपत्र तसेच ओळखपत्र दाखविल्याशिवाय उमेदवारांना परीक्षेस व परीक्षा कक्षात मिळणार नाही. तसेच परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी स्वत:ची ओळख (Identification) पटवून देण्याकरिता स्वत:चे पॅनकार्ड, आधारकार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसेंन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान एक ओळखपत्र मूळ प्रतीत व त्याची एक छायांकित प्रत साक्षंकित केलेली तसेच कार्यालयाने दिलेले स्वत:चे ओळखपत्राची मुळ प्रत व त्याची एक छायांकित प्रत - Self Attested, सोबत आणणे आवश्यक आहे.

२. एखाद्या विषयात मागील परीक्षेस जर सूट मिळाली असेल व त्यामुळे कार्यालय प्रमुखांनी अशा उमेदवारास संबंधित विषयासाठी प्रवेश दिला नसतानाही तो त्या विषयास पुन्हा बसला तर पूर्वी मिळालेली सूट रद्द ठरविण्यात येईल.

३. **ज्या प्रश्नपत्रिकांची उत्तरे पुस्तकांसह लिहावयाची आहेत, अशा वेळी उमेदवारांनी शासन प्रकाशित अधिकृत पुस्तके (स्वत:ची) (यथास्थिती केवळ बेअर ॲक्टस आणि / किंवा रुल्स) वापरावी. मुळ प्रतीमधील पुस्तके उपलब्ध नसल्यास छायांकित प्रती या कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीने सांक्षांकित केलेल्या असाव्यात.** परीक्षेसाठी असलेल्या कोणत्याही प्रश्नपत्रिकेवरील टिपण्या असलेली पुस्तके, मार्गदर्शिका किंवा पेजर, स्मार्ट वॉच, मोबाईल फोन, साधे किंवा प्रोग्रामेबल कॅलक्युलेटर वा नकाशे,इत्यादी वस्तू परीक्षा कक्षामध्ये आणण्याची उमेदवारांना सक्त मनाई आहे. सदर सूचनेचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास ती बाब शिस्तभंग असल्याचे समजण्यात येईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत तसेच विभागाचे मार्फत कारवाई केली जाईल. उमेदवारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे कडून कोणतीही पुस्तके पुरविली जाणार नाहीत.

४. **उमेदवारांने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना [अ,ब,क,ड किंवा १, २, ३, ४] सलगरित्या सोडवावेत. प्रश्नांचा एक भाग एका पृष्ठावर तर दुसरा भाग काही पृष्ठे सोडून अथवा काही अन्य पृष्ठावर उपप्रश्न सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल व अशा प्रश्नांच्या उत्तरांना शून्य गुण समजण्यात येतील.**

५. विभागीय परीक्षांचे निकाल घोषित झाल्यानंतर ज्या उमेदवारांना गुणांची पडताळणी (Retotalling) करावयाची आहे, अशा उमेदवारांनी निकालाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडे, बार्टी, पुणे यांजकडे अर्ज पाठविणे आवश्यक आहे. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा बार्टीकडून विचार केला जाणार नाही. याची सर्व परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

६. विभागीय परीक्षेच्या पारंपारिक स्वरुपाच्या उत्तरपुस्तिकेकरिता गुणांची पडताळणी (Retotalling) करण्यात येते, फेरमुल्यांकन केले जाणार नाही.

७. दिनांक ०५/१०/२०२१ च्या शासन निर्णयानूसार दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना भरपाई वेळ म्हणून प्रती तास २० मि. अधिक देण्यात येतील व शासन निर्णयानूसार इतर नियम लागू राहतील.

८. परीक्षेत अनधिकृत साहित्याआधारे नक्कल करण्यास किंवा दुसऱ्या उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेवरुन नक्कल करण्यास वा दुसऱ्या उमेदवारांकडून नियमबाह्य मदत घेण्यास किंवा दुसऱ्या उमेदवाराला नियमबाह्य मदत देण्यास अथवा तसा प्रयत्न करण्यास अथवा वारंवार आपल्या जागेवरुन उठण्यास सक्त मनाई आहे. खाजगी प्रकाशनाची पुस्तके वापरल्यास या सूचनेचे उल्लंघन करणारा उमेदवार शिस्तभंग कारवाईच्या तरतुदी अन्वये कारवाईस पात्र ठरेल.

९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे ची उत्तरपत्रिका ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणेची मालमत्ता असून ती अनधिकृतरित्या हाताळणे वा स्वत:जवळ बाळगणारी व्यक्ती कारवाईस पात्र ठरेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, सत्यमेव जयते, ★ पुणे-१.★

**१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेने विभागीय परीक्षा संदर्भाने केलेल्या सूचनांचे उमेदवाराने अत्यंत काळजीपूर्वक पालन करावे. सूचनांचे पालन न करणारा उमेदवार परीक्षा कक्षाबाहेर घालवून देणे, गुण वजा करणे, पुढील परीक्षांना प्रतिरोधित करणे, उमेदवारी रद्द करणे, इत्यादी शिक्षा देण्यास पात्र ठरेल. शिक्षा देण्याचा अधिकार सर्वस्वी महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांचा राहील.**

११. प्रश्नपत्रिकेत नेमून दिलेला वेळ संपल्यावर कोणत्याही उमेदवाराने प्रश्नाचे उत्तर लिहू नये किंवा त्यात फेरफार करू नये. प्रश्नपत्रिकेत नमूद केलेला वेळ संपण्यापूर्वी पाच मिनीटे पूर्व सूचनेची घंटा दिली जाईल. दुसरी घंटा झाल्यानंतर परिक्षार्थीने लिहिणे किंवा उत्तरात फेरफार करणे थांबविले पाहीजे.

१२. उत्तरे लिहीण्यासाठी परिक्षार्थींनी स्वत:चे पेन आणले पाहीजे. उत्तरपत्रिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे कडून पुरविल्या जातील. फक्त निळी, काळी शाईचे बॉलपेन वापरावे. इतर प्रकारची शाई, चमकणारी शाई, लाल पेन किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास सक्त मनाई आहे. या सुचनाचे उल्लंघन झाल्यास अशी उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही.

१३. प्रत्येक प्रश्नपत्रिकेवरील सुचनेप्रमाणे परिक्षार्थींनी प्रश्न सोडविले पाहीजेत. जर विहित संख्येपेक्षा अधिक प्रश्न सोडविले तर विहीत संख्येपर्यंत अगोदर सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे तपासली जातील. उरलेल्या प्रश्नांची उत्तरे दुर्लक्षित केली जातील. परिक्षार्थींने एका प्रश्नाचे उत्तर दोनदा लिहिल्यास तपासावयाचे नसलेले एक उत्तर रद्द समजण्याबाबत परिक्षार्थींने त्या उत्तरावर "उत्तर रद्द" असा शेरा नमूद करावा.

१४. **परीक्षा कक्षामधून बाहेर जाण्याबाबत –**

अ) प्रश्नपत्रिका परिक्षार्थींना वाटप केल्यापासून पाऊन तास (४५ मि.) उलटेपर्यंत कोणत्याही परिक्षार्थीला परिक्षा कक्षाबाहेर जावू देता येणार नाही.

ब) परिक्षा चालू असताना एखाद्या परिक्षार्थीला प्रसाधन कक्षास जावयाचे असेल तर त्याने / तिने बाहेर जाण्यापूर्वी समवेक्षक / पर्यवेक्षकांची परवानगी घेतली पाहिजे. तशी परवानगी घेतली नसल्यास त्यास / तीस परिक्षा कक्षामध्ये पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही.

क) जर एखाद्या परिक्षार्थीस परिक्षा सुरू झाल्यानंतर पाऊन तासानंतर परंतू परिक्षेची वेळ संपण्यापूर्वी जावयाचे असल्यास त्याने / तिने जाण्यापूर्वी समवेक्षकाकडे त्यांची / तिची उत्तरपुस्तिका दिली पाहीजे. जे अंतिम वेळेपर्यंत शेवटी राहतील त्यांनी समवेक्षकांने उत्तरपत्रिका घेईपर्यंत आपापल्या जागेवर बसून राहिले पाहिजे.

ड) वरील (अ), (ब) व (क) च्या अधिन राहून कोणत्याही परिक्षार्थींने कोणत्याही कारणास्तव पर्यवेक्षकांच्या परवानगीशिवाय आपली जागा सोडू नये.

१५).**उत्तरपुस्तिकेत प्रश्नांच्या वास्तविक उत्तराव्यतिरीक्त कोठेही नांव, बैठक क्रमांक, किंवा इतर अनावश्यक मजकूर लिहू नये, तसेच कोणत्याही नावाने स्वाक्षरी करू नये अथवा अन्य कोणतेही चिन्ह काढू नये किंवा ओळख पटविण्यासाठी कोणत्याही प्रकारची सांकेतिक चिन्ह किंवा आकृती काढू नये.**

**उपरोक्त सर्व सुचनांचे परिक्षार्थींनी पालन करणे अंत्यत आवश्यक आहे, सुचनांचे उल्लंघन करणारा परिक्षार्थी शिस्तभंग कारवाईच्या तरतूदी अन्वये कारवाईस पात्र ठरेल.**

**ठिकाण** : पुणे

**दिनांक** : ०१/०८/२०२४

जा.क्र.: ३७२८

Sunil Ware 1/8/24

**महासंचालक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था सत्यमेव जयते पुणे-१